जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ९५ दिनांक - ०६/०२/२०२४**

खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर

## रब्बील रज्जाक शेख (टोळी सदस्य) व त्याचे ०१ साथीदार यांचेविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई

फिर्यादी हे खडकी बाजार पुणे येथील एका कापड दुकानात सेल्समन म्हणुन नोकरी करतात. ते दि.१६/०१/२०२४ रोजी खडकी बाजार पुणे येथे असताना यातील आरोपी नामे रब्बील रज्जाक शेख यांनी काही एक कारण नसताना फिर्यादी यांना शिवीगाळ करुन तुमको चरबी चडी है साले किधर से आके खडकी मे धंदा करता है तुम्हारी चरबी निकालता हु असे धमकावुन फिर्यादीस दुकानातुन बाहेर ओडुन पी.एम.पी. बस स्टॉपवर घेवुन येवुन,रब्बील रज्जाक शेख व त्याचा साथीदार मुस्तफा जहीर खान यांनी फिर्यादी यांना लाकडी दांडक्याने मारहाण करुन गंभीर दुखापत केली त्याबाबत फिर्याद यांनी खडकी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने खडकी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.३४/२०२४ भा.द.वि.कलम.३२६,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्ह्याच्या तपासा दरम्यान **१)रब्बील रज्जाक शेख,वय ३२ वर्षे,रा.मेफेर एलिंगझा, कोंढवा,पुणे (टोळी प्रमुख) २)मुस्तफा जहीर खान,वय १९ वर्षे,रा.रॉयल हाईट्स,बोपोडी,पुणे (टोळी सदस्य)** यांना दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.

नमुद **आरोपी रब्बील रज्जाक शेख (टोळी प्रमुख)** यांने संघटित गुन्हेगारी टोळी तयार केली असुन त्यानी बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी किंवा अऩ्य कोणत्याही व्यक्तीसाठी गैरवाजवी आर्थिक फायदा व इतर फायदा मिळविण्याच्या उद्देशाने संघटीत गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकट्याने किंवा संयुक्तपणे हिसांचाराचा वापर करुन किंवा हिसाचार करण्याची धमकी देवुन किंवा धाकदपटशा दाखवुन किंवा जुलुम जबरदस्ती करुन किंवा अन्य अवैद्य मार्गाने आपले बेकायदेशीर कृत्य चालु ठेवुन संघटना किंवा टोळी म्हणुन संयुक्तपणे गुन्हेगारी कृत्य करणारा गट तयार केला असुन,त्यांचे विरुध्द पुणे शहरामध्ये खुनाचा प्रयत्न करणे व अन्य शरिराविरुध्दचे गुन्ह्याची नोंद आहे. त्याचेवर वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा-पुन्हा गंभीर स्वरूपाचे गुन्हे केलेले आहेत.

प्रस्तुत गुन्ह्यास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii) ३(२),३(४) चा अंतर्भाव करणेकामी खडकी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.गिरीशकुमार दिघावकर यांनी पोलीस उप आयुक्त,परि ४,पुणे शहर,श्री.विजयकुमार मगर यांचे मार्फतीने अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन खडकी पोलीस स्टेशन येथे गु.नं.३४/२०२४, भा.द.वि.कलम ३२६,३२३,५०४,५०६,३४ अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii) ३(२),३(४) चा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त,खडकी विभाग,पुणे,श्रीमती.आरती बनसोडे हया करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.अमितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे),पुणे,(पोलिस सह आयुक्त अतिरिक्त कार्यभार),श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ४,श्री.विजयकुमार मगर, मा.सहा.पोलीस आयुक्त,खडकी विभाग,श्रीमती.आरती बनसोडे यांचे मार्गदर्शनाखाली खडकी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.गिरीशकुमार दिघावकर, पोलीस उप निरीक्षक,अण्णा गुंजाळ, संतोष भांडवलकर, सर्वेलन्स पथकाचे पोलीस अंमलदार, रमेश जाधव,महिला पोलीस अंमलदार स्वाती म्हस्के यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरीराविरुद्ध व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारे व समाजामध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देणेबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिलेले आहेत. **२०२४ या चालु वर्षातील मकोका अंतर्गत केलेली ही ११ वी कारवाई आहे.**